26

# दारिद्रय रेषेखालील लोक आणि शासनाच्या योजना एक समाजशास्त्रीय अभ्यास

**प्रा.सुनिता कुकडे**
**के.के.एम.कॉलेज,मानवत.**
**समाजशास्त्र विभाग**

**प्रस्तावना :-**

अन्न, वस्त्र,निवारा या मानवाच्या तीन मुलभुत गरजा आहेत. भारतात प्रामुख्याने संयुक्त कुटुंब पध्दतीने राहणाऱ्या लोकांची संख्या भरपूर आहे. त्याचे मुळ कारण म्हणजे भारत हा कृषिप्रधान देश व त्यावर असलेले विविध व्यवसाय आहेत. मानवाच्या या तीन मुलभुत गरजा भागविण्यासाठी कुटूंबातील सर्व मार्गानी प्रौढ व्यक्ती प्रयत्न करीत असतात. कुटूंबातले सर्व मार्गाणी मिळणाऱ्या एकुण उत्पन्नाने या मुलभुत गरजा पुर्ण होतातच असे नाही. कुटूंबातील अर्मादीत संख्येमुळे या मुलभुत गरजा भगविल्या जात नाहीत तेव्हा या अवस्थेला 'दारिद्रय' असे म्हणतात. दारिद्रय ही एक आर्थिक समस्या आहे परंतु या समस्येमुळे अनेक सामाजिक समस्या जन्माला येतात व समाजातत असमतोल निर्माण होतो.

काही तज्ञांनी ' **दारिद्रयाची व्याख्या**' ही खालील प्रमाणे पुर्ण केल्या आहेत.

१) "व्यक्तीला आवश्यक व इतर गरजा पुर्ण करून समाजाच्या अपेक्षेप्रमाणे इतर सर्व व्यक्ती प्रमाणे जगता न येण्यासारखी परिस्थीत म्हणजे दारिद्रय - **"समाजशास्त्र विश्वकोष"**

२) "**दारिद्रय** ही एक अशी अवस्था आहे की, ज्यामुळे कोणतेही व्यक्ती अपुरे उत्पन्न किंवा गैर वाजवी खर्चामुळे स्वतःचा जिवनस्तर उंचवाऊ शकत नाही. अगर स्वतःची मानसिक तंदरूस्ती ठिकवुन घेऊ शकत नाही.

तसेच ते ज्या समाजाचे सदस्य आहेत. त्या समाजाचे जिवन मुल्याप्रमाणे योग्य कार्य करून शकत नाही. **- गिलीन आणि गिलीन** या व्याख्येवरून हे स्पष्ट होते की, ज्या वेळेस व्यक्तीला आपण **दारिद्रय** आहोत तेव्हा त्यांच्यामध्ये न्युनगंड निर्माण होतो. त्यांची मानसिक स्थिती खालावते. आणि बऱ्याच वेळेस कुटूंब प्रमुख **"आत्महत्येसारख्या समस्येस** बळी पडतो. किंवा **व्यसनास** बळी पडतो त्यामुळे इतर काही सामाजिक समस्या निर्माण होतात. आणि सामाजिक समतोल बिघडतो सामाजिक आरोग्य धोक्यात येते. यांचा परिणाम फक्त कुटूंबालाच नाही समाज, राष्ट्राला सुध्दा होतो.ही समस्या साथीच्या रोगाप्रमाणे एका कुटूंबाकडुन दुसऱ्या कुटूंबाला लागण होते. व या समस्येचे भयानक स्वरूप पहावयास मिळते. श्रृखंले प्रमाणे एकानंतर एक अशा बऱ्याच **आत्महत्येच्या घटना** पाहावयास मिळतात. शेतातील उत्पन्न व कर्ज न फेडुन कंटाळुन होणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या हे सध्याचे जिवंत उदाहरण आहे. या समस्येचे हजारो शेतकरी उधवस्त झाले.

भारतात १९६० नंतर देशातील दारिद्रय या समस्येचा विचार करण्यात आला. दांडेकर व रथ यांनी लिहीलेला **भारतातील दारिद्रय** या ग्रंथात भारतातील दारिद्रयाचे प्रमाण सांगितले आहे. दारिद्रयाच्या या भिषणावह परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन भारत सरकारने दारिद्रय निर्मुलनासाठी अनेक योजना राबुनही समस्या समाप्तीसाठी वारंवार प्रयत्नशिल आहे. काही अंशी शासनाने राबविलेल्या योजनेमुळे या समस्या काही प्रमाणात कमी झाल्या असल्या तरी दारिद्रयाचे समुह उच्चाटन करण्यासाठ उपाययोजनेला काही मर्यादा स्पष्ट झाल्या आहेत.

काही विचारवंतानी, संतानी यावर अनेक उपाययोजना सुचविल्या असुन बहुतांशी त्या पुस्तकातच राहील्या **अज्ञान व अशिक्षीतपणामुळे** त्या लोंकापर्यंत पोहचल्याच नाहीत. संत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेतुन प्रबोधन केले. पण हे ग्रंथ लोकापर्यंत पोहचलेच नाही या सर्वांचे कारण **अज्ञान** हेच आहे असे सांगतांना संत तुकडोजी महाराज म्हणतात.एक **राहीला गरिब गडी**
**एकाची वाढली श्रीमंती बडी**

**ही सर्व अज्ञानाची बेडी - भोहवली सगळयांना** (१४ वा अध्याय पेज १५४)
दारिद्रयाचे प्रमुख कारण सांगताना संत तुकडोजी महाराज सांगतात त्या समाजातील बुध्दीमान लोंकामुळे काही लोकांना दारिद्रय आले.
**काही ने खुप बुध्दि लढविली ,संपती आतोनात वाढविली , काढोनी कवडिही नाही दिली, प्राण जाता श्रमिकांचा**

कारण काही असोत दारिद्रय निर्मुलण करणे ही एक भारत सरकारची प्राथमिकता आहे. नाहीतर समाजामध्ये दुफळी माजेल व देशासाठी विघातक आहे. प्रशासनाने याचे गांर्भीर्य दारिद्रय निर्मुलणासाठी अनेक उपाय योजना राबविण्यात आल्या आहेत.

**शासनाचे खालील उपाय :-**

**१) क्रांतीज्योती सुकन्या योजना :-**

ही योजना १ जानेवारी २०१४ पासुन आम्लात आली आहे. या योजनेसाठी राज्यसरकारने ५७३ कोटी ची तरतुद केली आहे. या योजनेनुसार मुलगी जन्माला झाल्यावर तिच्या नावे राज्यसरकार आयुर्विमा महामंडळात २१,२००/- रूपये तिच्या नावाने गुंतविणार आणि ती १८ वर्षांची झाल्यावर तिला एक लाख रूपये मदत मिळणार आहे. ही योजना फक्त दारिद्रय रेषेखालिल लोकांना लागु आहे. या पैशातुन तिला ९ वी ते १२ पर्यंत १०० रूपये शिष्यवृत्ती मिळणार आहे. तसेच मुलगी १८ वर्षांची होईपर्यंत लग्न करू नये अशी अट करण्यात आली आहे.

**२) इंदीरा आवास योजना :-**

ग्रामिण भागातील १५ कोटी कुटूंबापैकी अडीच कोटी कुटूंबाला स्वत:चे घर नाही. स्वातंत्र्यानंतर अशी अवस्था आहे त्यांचे पुर्नवसन करणे आवश्यक आहे. पंचवार्षिक योजनेमार्फत घर बांधणी साठी २ % रकमेत गरजा न भागल्यामुळे २००७ मध्ये **सर्वांसाठी निवास** उपलब्ध करून दिले. पर्यावरण विकासाची अभिनव योजना म्हणुन इंदीरा आवास योजना राबविण्यात आली. केंद्र सरकारची पुर्वीची घरकुल योजना व जवाहर रोजगार योजनेचा विस्तारीत भाग म्हणजे इंदीरा आवास योजना होय.

**३) महाराष्ट ग्रामिण हमी रोजगार योजना :-**

भारतात बेकारीचा प्रश्न आहे. त्याची तिव्र परिणाम दिसुन येत असल्यामुळे विघटनाच्या समस्या निर्माण होतात. महाराष्ट्रात १० कोटी लोकसंख्येपैकी ५५७ कोटी लोकसंख्या ग्रामिण भागात राहतात. दलित, आदिवाशी, अनुसुचित जातीजमाजी, दारिद्रय रेषेखालील लोकांचे प्रमाण जास्त आहे. म्हणुन रोजगारासाठी ही योजना आलेली आहे. म्हणुन घटनेत **मागदर्शक तत्वात** म्हटले आहे. प्रत्येक नागरिकाला उपजिवीकीचे साधन प्राप्त होतील अशी शासनाने व्यवस्था करावी, सामाजिक हिताला प्राधान्य देऊन उत्पादनाच्या साधनांवर वितरणावर शासनाने नियंत्रन ठेवावे, प्रत्येक स्त्री- पुरूषाला समान वेतन मिळावे,आर्थिक विकास करण्यासाठी व्यक्तीला झेपणारे काम दयावे , लहान मुलांचे शोषण होणार नाही. कामाच्या ठिकाणची परिस्थिती न्यायपुर्ण असावी, ज्याने आरोग्य चांगले राहील.

केंद्र शासन पुरस्कृत शहरी भागातील दारिद्रय रेषेखालील कुटूंबांसाठी योजना :-

**अ) स्वयंरोजगार :-**

नागरी भागतील दरिद्रय रेषेखाली असलेल्या लोकांना छोटे उद्योग उत्पादने , पारंपारिक सेवा , व्यवसाय करण्यासाठी प्रोत्साहित केले जाते.
.

या योजने मध्ये लाभार्थींना बॅक्केकडून रु२,००,०००/- पर्यंत कर्ज देण्यात येते . प्रकल्प किमतीच्या २५% किंवा रु ५०,०००/-रु अनुदान देण्यात येत. लाभर्थीने प्रकल्प किंमतच्या ५% रक्कम बीज भांडवल म्हणून परत फेड करण्च्याकालावधी ३ -४ वर्षात करायची असते.

**ब) स्वयंसहयाता /बचत गट :-**

द्ररिद्र रेषाखालील महिलाना बचत गट स्वयम सहीता अट ओळखली जाते.महिला या मेहनती व काटकसर व बचत करता त्या गटाना प्रति गटानाप्रती महा १००००/-मिळते व फ्रिते भांडवल असते महिला सबल बनण्यासाठी **महिलापरिर्वतन मेळावे** घ्येण्यात आले. व महिलाना पोत्साहन व प्रतिसाद मिळला .

१) **महिला व बालके विकस** :- याला डावाका गट म्हणता. सक्षम बचत गट निर्माण करून यंशस्वी झालेल्य गटाना **सामूहिक व्यवयसाय** करता येते अनेक फायेदे मिळतात व बॅके कडून कर्ज व अनूदान मिळते अनेक व्यावसयाचो प्रक्षिशण मिळतो. त्याच फायदा महिलाना व मुलांना मदत होते.

२) **सामाजिक समाजविकास संस्था** :-दोन हजार कुंटूबाचे सामजाविक्रस संस्था तयार कराता येतो.या संस्थो चे नियंत्रण धर्मदाय आयुक्ता संस्थेकडे लाभार्थीचे निवडून अर्ज भरून घेतले जाते. या योजनो तफे कर्ज परत फेडीवर नियंतत्र ठेवले जाते. समाज विकास योजने तर्फ विविध घटकाची माहिती व्यक्तीगत ओरोंग्य,शिक्षण ,कायदेविषयक माहिती रोजगार निवड प्राबोधन कार्याक्रम घेतले जातात ,महिलासाठी विविध कार्यक्रम घेतले जातात.

३) **प्रशिक्षण:-** स्वर्णजयंती प्रक्षिशण निवडलेल्या व्यासासयबाबत कैशल्या निधी होउून बेरोजगारी दूर करण प्रशिक्षण शासनाकडून घोतले जाते ,गरिब कुटूबाातील लोकाना प्रक्षिशण ,याछों फायदे कुशल,अर्ध कुशल व्याक्तीना लाभ होतो. महिलाना व्यवसाया करण्यासाठी प्रोत्साहणसाठी व आत्मविशास निभर्यप्रमाण निर्माण होतो. बॅके कडून कर्ज व शासनाकडून अनूदान मिळते व बाजारपेठेत महत्व प्रप्त होते.

४) **संजय गाधी निराधार अनूदन योजना**:- सामाजीक न्याय विभागने अधं ,अपंग व शारिरक व मानसिक अजारान, वर्ध व्यक्ती , अत्यचारीत महिला, वैशाव्यासायातील महिला याना अर्थासाय्यासाठी हि योजाना राबवण्यात आली, याची अशी अट आहे १५वषापासून महाराष्ट्रातील रहिवासी असला पाहिजे,६५पेक्षा वय कमी असावे, याचे काही कागदीपुरावे द्यावे लाागतात. या शासकीयस योजना असून यातून समस्या सूटलेल्या नाहीत भारतातील दारीद्र ६५%आहे ग्रामीण भागताील रोजचा खर्चासाठी ३५रु६५ पै व शहराभागात ७०रु ६६.पौ दर महा ग्रामीण भागता १०५४रु शहरी भागत १९८४ रु आहेत .२००९-१० च्या सर्वे नूसार ग्रामीण भगात ६४.४७% शहरी भागत ६६.७०% दारिद्रय रेष खाली आहे. अजूनही भारतात एकूण लोकसंख्येच्या तुलनेत दारिद्रयचे प्रमाण जास्त आहे. यात आळशी, व्यासनी, कमवण्याऱ्याची संख्या कमी खाण्यऱ्याची संख्या जास्त हि विषमता दिसून येते. श्रीमंत अजून श्रीमत झालेत व गरीब अूजन गरीब झाले यातून भारताच्या विकासात अडथळे येऊ शकातात.

**सारांश**

दारिद्रय निर्मुलनासाठी कितीही योजना राबविल्या तरी दारिद्रय निमुलनांचे समुह नष्ट होईल याची खात्री देता येत नाही. नवनविन दारिद्रय रेषेखालील कुटूंबाची संख्या वाढतच आहे, **“शिक्षण ”** हा यासाठी प्रभावी उपाय आहे, त्याबरोबरच स्त्रियांच्या उत्पन्नामुळे महत्वाचा वाटा असल्यामुळे त्यांचे स्वातंत्र्य व सामाजिक सुरक्षितता या गोष्टीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. **“पुरूषप्रधान”** सांस्कृतीमुळे कुटूंबाला मिळणाऱ्या उत्पन्नाची विल्हेवाट लावण्याचा पुर्ण अधिकार पुरूषास असल्यामुळे बहुतांशी दारिद्रय रेषेखाली व्यसनाधिन असल्याने दारिद्रयात वाढ होत आहे. त्यामुळे स्त्रियास आणखीन काही कृतीशिल अधिकार व सुरक्षितता दिल्यास काही अंशी दारिद्रय निर्मुलनास मदत होईल.

दारिद्रय निर्मुलनाच्या अनेक योजना असल्या तरी त्या राजकिय हेतुने प्रेरित असल्यामुळे त्या गराजा गरजु पर्यंत पोहचु शकत नाही. काही योजना फक्त कागदोपत्रीच आहेत. तरी काही योजनांचा लाभ दारिद्रय रेषेखालील नसलेले सदन लोक फायदा घेत आहेत. जर अशा लोंकावर कठोर कार्यवाही झाली व गरजु लोकापर्यंत योजना पोहचल्या तर काही अंशी या योजनेला यश मिळेल. राजकीय लोक प्रामाणिकपणे याची अंमलबजावणी करीत नाहीत. आपले नातेवाईक व हितसंबंध असलेल्या लोकांनाच याचा कसा फायदा होईल. यासाठी प्रयत्नशिल असतात. दारिद्रय निर्मुलनाच्या उपाय योजनेत येणाऱ्या अडचणींचा आढावा घेऊन यावर शासनाने कठोर उपाय योजना आखली पाहीजेत.

**<u>संदर्भसुची</u>**


* लोकराज्य
* महाराष्ट्र शासन वेबसाईट
* महाराष्ट्र टाईम्स
* महीला विकास योजना -निर्मलाताई मालपाणी
* सामाजिक कल्याण आणि न्याय - नागनाथ कोतापल्ले
* ग्रामगीता - संत तुकडोजी महाराज
* साहीत्य भवन पब्लिकेशन महिला व समाज - डॉ.शर्मा